# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA-2.96)

## व्यवस्थापन परिषदेच्या २१६ व्या (तातडीच्या) ऑनलाईन बैठकीचा कार्यवृत्तांत

## गुरुवार, दि. २५ जून, २०२६ रोजी सकाळी ११:०० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची २१६ वी बैठक (तातडीची) ऑनलाईन पध्दतीने **गुरुवार, दि. २५ जून, २०२६ रोजी सकाळी ११:०० वा.** Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने मा.कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरन्सने बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | ऑनलाईन उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश आण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. आय. जे. तांबोळी | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. कैलाश जगन्नाथ करांडे | सदस्य | उपस्थित |
| ८) | प्राचार्य डॉ. धिरजकुमार रंगनाथ बाड | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| १०) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १२) | श्री. महादेव धरेप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १७) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १८) | डॉ. अजयकुमार जाधव, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्य | अनुपस्थित |

| | | | |
|---|---|---|---|
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण)<br>तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए महादेव सोमशंकर खराडे<br>वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | डॉ. अतुल लकडे, प्र. कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

स्वागत:

प्र.कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १ ] | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये B.Sc. in Cosmetology and Wellness हा नवीन अभ्यास पाठ्यक्रम ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून रसायनशास्त्र संकुलांतर्गत सुरु करण्यास विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: सद्यस्थितीत विद्यापीठ परिसरात एकूण ११ संकुले अस्तित्वात आहेत. सदर संकुलांतर्गत कला, ललित कला, सामाजिकशास्त्रे, वाणिज्य व व्यवस्थापन, विज्ञान व तंत्रज्ञान इ. विषयांशी संबंधित अभ्यासक्रमांचे अध्ययन व अध्यापन केले जाते.<br>सध्याच्या युगात सोलापूर जिल्हा परिसरातील विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षणाच्या दृष्टीने तसेच काळाची गरज म्हणून सौंदर्यप्रसाधन, वेलनेस, स्कीनकेअर, हेअरकेअर, स्पा आणि हेल्थ इंडस्ट्रीमध्ये वाढती मागणी लक्षात घेवून तंत्रज्ञान संकुलांतर्गत B.Sc. in Cosmetology and Wellness हा पदवी अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे आवश्यक वाटल्याने आणि सदरचा अभ्यास पाठ्यक्रम केंद्र शासनाच्या नोंदणीकृत IICTN (Indian Institute of Cosmetology, Trichology & Nutrition Pvt. Ltd. Mumbai) या संस्थेच्या धर्तीवर तंत्रज्ञान संकुलात सदर अभ्यास पाठ्यक्रम सुरु करणे सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताशी अनुरुप असल्याने दि.१६/०५/२०२६ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सदरील विषय ठेवला असता, त्यावर विषय क्र. ५ अन्वये खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>ठराव: "प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील तंत्रज्ञान संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून B.Sc. in Cosmetology and Wellness हा नवीन अभ्यास पाठ्यक्रम ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देऊन विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली."<br>उक्त ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील तंत्रज्ञान संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून B.Sc. in Cosmetology and Wellness हा नवीन अभ्यास पाठ्यक्रम ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह सुरु करण्याची बाब विद्यापरिषदेच्या दि.२६/०५/२०२६ रोजीच्या बैठकीत विषय क्र. ९७ अन्वये विषय सादर केला असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.<br>ठराव: "प्रस्तुत विद्यापीठामध्ये B.Sc. in Cosmetology and Wellness हा नवीन अभ्यास पाठ्यक्रम ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून सुरु करण्यासाठी सर्वानुमते व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. तसेच सदरचा अभ्यासक्रम रसायनशास्त्र या संकुलाअंतर्गत सुरु करण्यात यावा असेही सर्वानुमते ठरले.<br>तसेच या अभ्यास पाठ्यक्रमाचा अभ्यासक्रम लवकरात लवकर तयार करण्यात यावा असेही ठरले."<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठामध्ये B.Sc. in Cosmetology and Wellness हा नवीन अभ्यास पाठ्यक्रम ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून रसायनशास्त्र संकुलांतर्गत सुरु करण्यास विद्यापरिषदेने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ | संलग्नता विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठामध्ये B.Sc. in Cosmetology and Wellness हा नवीन अभ्यास पाठ्यक्रम ३० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसह शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून रसायनशास्त्र संकुलांतर्गत सुरु करण्यास विद्यापरिषदेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ २ ] | प्रस्तुत विद्यापीठ नवीन विस्तारीत प्रशासकीय व परीक्षा भवन इमारत, खेलो इंडीया योजनेंतर्गत मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम, स्मारक व टॉवरचे बांधकाम पूर्णत्वास आले असून सदरच्या तीन्ही इमारतीचे लोकार्पण करण्याकरिता मा. राष्ट्रपती महोदय व मा. पंतप्रधान महोदय यांना इमारतीचे लोकार्पण करण्याकरिता बोलावण्याची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ नवीन विस्तारीत प्रशासकीय व परीक्षा भवन इमारत, खेलो इंडीया योजनेंतर्गत मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम, स्मारक व टॉवरचे बांधकाम पूर्णत्वास आले असून सदरच्या इमारतीचे लोकार्पण होणे आवश्यक आहे.<br><br>सदरच्या इमारतीचे लोकार्पण मा. राष्ट्रपती महोदय व मा. पंतप्रधान महोदय यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्याकरिता मा. राष्ट्रपती महोदय व मा. पंतप्रधान महोदय यांना आमंत्रित करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.<br><br>सबब, प्रस्तुत विद्यापीठ नवीन विस्तारीत प्रशासकीय व परीक्षा भवन इमारत, खेलो इंडीया योजनेंतर्गत मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम, स्मारक व टॉवरचे बांधकाम पूर्णत्वास आले असून सदरच्या तीन्ही इमारतीचे लोकार्पण करण्याकरिता मा. राष्ट्रपती महोदय व मा. पंतप्रधान महोदय यांना इमारतीचे लोकार्पण करण्याकरिता बोलावण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठ नवीन विस्तारीत प्रशासकीय व परीक्षा भवन इमारत, खेलो इंडीया योजनेंतर्गत मल्टीपर्पज हॉलचे बांधकाम, स्मारक व टॉवरचे बांधकाम पूर्णत्वास आले असून सदरच्या तीन्ही इमारतीचे लोकार्पण करण्याकरिता मा. राष्ट्रपती महोदय किंवा मा. पंतप्रधान महोदय यांना इमारतीचे लोकार्पण करण्याकरिता बोलावण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ३ ] | प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांना वसतिगृह वार्षिक शुल्क आकारणी खालीलप्रमाणे करण्याची बाब विचारार्थ. | वसतिगृह विभाग |

टिपणी: दि.०२ मे, २०२६ रोजीच्या २१३ व्या व्यवस्थापन परिषदेचा ठराव क्रमांक १४. नुसार प्रथम वर्ष Sem - I रु.४,०००/- व प्रथम वर्ष Sem- II रु.३,०००/- असे एकूण वार्षिक शुल्क रु.७,०००/- इतके करण्यात आले आहेत. तद्नंतर प्रवेशे समिती (२०२६-२७) बैठक दि.०२/०६/२०२६ रोजीच्या बैठकीत संकुलांतर्गत असणाऱ्या विद्यार्थ्यांना Hostel Deposit रु.२०००/- आणि मेसकरिता ५,०००/- रु. Deposit करुन घेण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले आहे.

सदर बाबीची अंमलबजावणी करणे करिता प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांना वार्षिक वसतिगृह शुल्क एकूण रु.७,०००/-, वसतिगृह अनामत ठेव एकूण रु.२,०००/- आणि मेस अनामत ठेव रु.५,०००/-इतके आकारल्यास त्याची विभागणी खालीलप्रमाणे करावी लागणार आहे.

| अ. क्र. | तपशिल | पहिला टप्पा (प्रवेशावेळी) | दुसरा टप्पा (वर्षातील अंतिम सत्राच्या सुरवातीस) |
|---|---|---|---|
| १ | Admission fee | ५०० | -- |
| २ | Room rent | २४०० | २४०० |
| ३ | Hostel Sports and Recreation club fee | २०० | २०० |
| ४ | Water and electricity charges | ४०० | ४०० |
| ५ | Room Maintenance | ५०० | |
| ६ | Hostel and lock deposit | २००० | -- |
| ७ | Mess deposit | ५००० | -- |
| | Total | ११,०००/- | ३,०००/- |

सबब, वरील तक्त्याप्रमाणे प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांस वार्षिक वसतिगृह शुल्क आकारणीची अंमलबजावणी करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **प्रस्तुत विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर वर्गाच्या प्रत्येक विद्यार्थ्यांना वसतिगृह वार्षिक शुल्क खालीलप्रमाणे आकारणी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ. क्र. | तपशिल | पहिला टप्पा (प्रवेशावेळी) | दुसरा टप्पा (वर्षातील अंतिम सत्राच्या सुरवातीस) |
|---|---|---|---|
| १ | Admission fee | ५००/- | -- |
| २ | Room rent | २,४००/- | २,४००/- |
| ३ | Hostel Sports and Recreation club fee | २००/- | २००/- |
| ४ | Water and electricity charges | ४००/- | ४००/- |
| ५ | Room Maintenance | ५००/- | |
| ६ | Hostel and lock deposit | २,०००/- | -- |
| | एकूण | ६,०००/- | ३,०००/- |

**तसेच वसतिहामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक मेस शुल्क रु.३०,०००/- खालीलप्रमाणे आकारणी करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | पहिला टप्पा (प्रवेशावेळी) | दुसरा टप्पा (वर्षातील अंतिम सत्राच्या सुरुवातीस) |
|---|---|---|
| १. | १५,०००/- | १५,०००/- |

डॉ. सुशिल कुमार शिंदे यांनी मा.कुलगुरु महोदय यांच्या परवानगीने खालीलप्रमाणे ठराव मांडला.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ४ ] | मार्च/एप्रिल, २०२६ मधील परीक्षांचे निकाल मा.कुलगुरु महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पूर्ण केल्याबद्दल प्रा. डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु व संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे अभिनंदन करण्यात यावे. | परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग |
| ठराव: | मार्च/एप्रिल, २०२६ मधील परीक्षांचे निकाल मा.कुलगुरु महोदय यांच्या मार्गदर्शनाखाली वेळेत पूर्ण केल्याबद्दल प्रा. डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ व त्यांच्या सहकारी अधिकारी / कर्मचारी यांचे सर्वानुमते अभिनंदन करण्यात आले. | |

मा. कुलगुरु, मा.प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र.कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

२५/६/२०२६

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद